जा. क्र. प्रा/प्राशि/मान्यता/पीआर,
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे. १. यांचे कार्यालय,
दिनांक :- २९ जानेवारी, १९८५.

5 FEB 1985

प्रति
शिक्षणाधिकारी,
जिल्हा परिषद,
पुणे

विषय : सन १९८४-८५ या शैक्षणिक वर्षात [ जून १९८४ पासून ] खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.

मराठी/~~इंग्रजी~~ माध्यमाच्या प्राथमिक शाळेस परवानगी.

संदर्भ : शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. व्हीएनएस १०८४/(१०२६)प्राशि-३ दिनांक २९/१२/८४ चे पत्र.

वरील विषयासंबंधीचे या कार्यालयांस उद्देशून लिहिलेले व आपले कार्यालयांस पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भित पत्र कृपया अवलोकावे.

२/- या बाबत कळविण्यांत येते की, खालील नमूद केलेल्या संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून, १९८४ पासून नेहमीच्या विहित अटीवर तसेच "खास बाब" करून खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विना अनुदान तत्वावर खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास विशेष बाब म्हणून परवानगी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | सुरु असलेले वर्ग | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १) | रुपीनगर शिक्षण प्रसारक मंडळ, रुपीनगर पो. तळवडे ता. हवेली जि. पुणे. | मराठी माध्यमाची प्राथमिक शाळा रुपीनगर जि. पुणे. | पहिली ते दुसरी | मराठी |

३/- या बाबत आपणांस कळविण्यांत येते की, संस्थेबाबत खालील नमूद केलेल्या अटींची खात्री करून घ्यावी.

१] संस्था सदर शाळा विना अनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिकदृष्ट्या सक्षम असली पाहिजे. [ इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळेसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करणार नाही, अशा प्रकारे संस्थेच्या अध्यक्षांच्या सहीनिशी लेखी हमीपत्र प्राप्त करून या कार्यालयाकडे पाठविण्याची दक्षता घ्यावी. ]

.. २/-

२] संस्थेने शाळेसाठी शासनाने विहित केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली, १९४९ मध्ये विहित केलेल्या अटींनुसार जागा, शैक्षणिक साहित्य आणि इतर सुविधांची सोय केली पाहिजे. तसेच शाळेसाठी विहित केलेल्या नियमानुसार विहित वयोमर्यादित व प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमला पाहिजे व त्यांना शासनाने विहित केलेल्या दराने वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

३] संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे [ उदा. वर्गातील विद्यार्थी संख्या, विद्यार्थ्यांचे प्रवेश इत्यादि. ] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

४] संस्थेने जवळपासचे शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणतेही दुष्परिणाम होणार नाहीत, याची दक्षता घेतली पाहिजे.

५] तसेच ही परवानगी देण्यापूर्वी प्रत्येक संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची खात्री करून घेऊन मगच त्या संस्थेला खाजगी शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व या बाबत केलेल्या कार्यवाहीचा अंतिम अहवाल या कार्यालयास पाठवावा.

१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० या दोन्ही अधिनियमाखाली नोंदली आहे.

२] संस्थेविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैर व्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत, अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६] तरी या बाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी.

"स्थळ प्रतीवर शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे यांची सही असे."

(सही) कायवार
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे. १. करिता.

गेडाम/-

प्रत : प्रशासनाधिकारी/महानगरपालिका शिक्षण मंडळ, ____________
____________ जिल्हा ____________ यांना माहितीसाठी.

प्रत : अध्यक्ष, ~~पूर्णानगर शिक्षण प्रसारक मंडळ, पूर्णानगर पो. नऱ्हे ता. हवेली जि. पुणे यांना माहितीसाठी.~~

प्रत : मा. उपसचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई – ३२ यांना त्यांचेकडील संदर्भित पत्रानुसार माहितीसाठी सविनय सादर..